**वित्तीय मान्यता**

**"सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणा, अकोला येथील अधिकारी/ कर्मचारी यांचे वेतन व भत्ते या उद्दिष्टाकरीता लेखाशिर्ष २४०१ ०३१४ , (३६), सहायक अनुदाने (वेतन) या घटकासाठी पुरवणी मागणीद्वारे मंजूर झालेला उर्वरित निधी उपलब्ध करुन देणेबाबत."**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पूरक २८२३/प्र.क्र.१२८ /१७-अे**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०००३२
दिनांक : १३ फेब्रुवारी, २०२४

**वाचा**

१) महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणा, अकोला यांचे पत्र जा.क्र./बिप्रयं/लेखा-२/ अनू. मागणी/३७४/२०२३, दि. ०४/५/२०२३.
२) महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणा, अकोला यांचे पत्र जा.क्र./बिप्रयं/लेखा-२/ प्र.क्र. ४८५/अनू.मागणी/७४६९/२२, दि. २०/०७/२०२२.
३) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. पूरक-२०२३/प्र.क्र. ६२/अर्थ-३, दि. २८/०७/२०२३
४) शासन निर्णय समक्रमांक दिनांक ०५ सप्टेंबर, २०२३
५) महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणा, अकोला यांचे पत्र जा.क्र./बिप्रयं/लेखा-२/ ६९/२०२४, दि. १७/०१/२०२४.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणा, अकोला यांनी सन २०१९-२० पासून महसूली उत्पन्नात घट झाली असल्या कारणाने तसेच, सातवा वेतन आयोगामुळे यंत्रणेच्या खर्चात वाढ झालेली असल्याने यंत्रणेमध्ये कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यावरील खर्च भागविण्यासाठी सन २०२२-२३ व सन २०२३-२४ करीता रु. १२.८० कोटी इतके सहायक अनुदानाची मागणी लेखाशिर्ष २४०१ ०३१४ (योजनेत्तर योजना) अंतर्गत संदर्भीय वाचा येथे नमूद पत्र क्र. १ व २ अन्वये केली होती. त्यानुषंगाने, उक्त यंत्रणेस वेतन व भत्ते यावरील खर्च भागविण्यासाठी महाराष्ट्र विधानमंडळाच्या जुलै-२०२३ च्या अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीद्वारे रु. १२.८० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने वाचा येथे नमूद क्र. ३ येथील परिपत्रकानुसार सदर मंजूर निधीपैकी रु. ८.९४ कोटी इतका निधी वितरीत करण्यास वित्त विभागाने मान्यता दिलेली होती. त्यानुसार वाचा येथे नमूद क्र. ४ येथील दि. ०५/०९/२०२३ च्या शासन निर्णयान्वये सदरचा निधी वितरीत करण्यात आलेला आहे. आता, उर्वरित निधीपैकी रु. २.३६ कोटी इतका निधी वितरीत करण्याची विनंती वाचा येथे नमूद क्र. ५ च्या पत्रान्वये करण्यात आली आहे. त्यानुषंगाने निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणा, अकोला येथील कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यावरील खर्च भागविण्याकरीता लेखाशिर्ष २४०१ ०३१४, ३६, सहायक अनुदाने (वेतन) या घटकासाठी जुलै २०२३ च्या विधानमंडळाच्या अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीद्वारे रु. १२.८० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे. सदर निधीपैकी सन २०२२-२३ करीता रु. ५.०७ कोटी व सन २०२३-२४ करीता रु. ३.८७ कोटी असा एकूण रु. ८.९४ कोटी इतका निधी वितरीत करण्यास यापूर्वी

दि. ०५/०९/२०२३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. आता, उर्वरित निधीपैकी रु. २.३६ कोटी इतका निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. या प्रित्यर्थ होणारा खर्च सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात येऊन, खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र. डी-३<br>
२४०१ पीक संवर्धन<br>
१०३ बी-बियाणे,<br>
(००) (००) (०३) बीज प्रमाणन (दत्तमत) (अनिवार्य)<br>
३६, सहायक अनुदाने (वेतन)<br>
( २४०१ ०३१४)

३. सदरचा निधी महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणा, अकोला यांना आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वितरण करावे. तसेच, यंत्रणेस आलेले उत्पन्न व बाबनिहाय केलेला खर्च व उत्पादनाचा तपशील प्रत्येक महिना संपल्यानंतर शासनास त्यांचे अभिप्रायासह सादर करावे. प्रस्तुत निधी खर्च करताना वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय / परिपत्रके यामधील मार्गदर्शक सूचनांचे व अटींची पूर्तता करण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २५/२०२४/व्यय-१, दि. ०८/०२/२०२३ रोजी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०२१३१५५९२५२३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PIMPALE PRASHANT RAMESH

Digitally signed by PIMPALE PRASHANT RAMESH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=fa29ab2a9a96d3a62a7a97531711f1ef9f3e78de039be6cabb44929032069507, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C9FC0E76E90819F7F6D29D043A3E393D7982322683A082D04EDA26B7264E4837, cn=PIMPALE PRASHANT RAMESH
Date: 2024.02.13 16:08:15 +05'30'

**( प्रशांत र. पिंपळे )**<br>
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) अपर मुख्य सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई<br>
२) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे<br>
३) महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर<br>
१) सहसचिव ( निविष्ठा व गुणनियंत्रण) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.<br>
२) सह सचिव (अर्थसंकल्प), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.<br>
३) कृषि संचालक, महाराष्ट्र बीज प्रमाणीकरण यंत्रणा, अकोला<br>
४) कृषि संचालक ( निविष्ठा व गुणनियंत्रण ), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे<br>
५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,<br>
६) वित्त विभाग- (व्यय-१/अर्थसंकल्प -१३), मंत्रालय, मुंबई<br>
७) कक्ष अधिकारी (२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.<br>
८) १७-अे कार्यासन, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई (निवड नस्ती)